| MHKO170003352015 | **नियमित दिवाणी दावा क्र. ७२/२०१५**<br>श्री. शंकर श्रीपती पाटील<br>वि.<br>दत्तात्रय गणपती पाटील वगैरे |
| --- | --- |

## नि. १२५ व १२६ खाली आदेश

१. प्रस्तुत अर्ज हे प्रतिदाव्यातील वादी यांनी झालेला अबेटमेंट आदेश रद्द होउन प्रतिदाव्यातील वादी क्र. ९ यांचे वारस रेकॉर्डवर आणणेकरीता दाखल केलेला आहे.

२. मुळ वादी यांनी नि. १२५ वर त्यांचे म्हणणे सादर केलेले नाही. त्यामुळे सदर नि. १२५ वरील अर्ज त्यांचे म्हणणे शिवाय चालविण्यात आलेला आहे.

३. मुळ वादी यांनी नि. १२६ वर त्यांचे म्हणणे सादर करुन असा युक्तिवाद केला की मयताचे सर्व वारस हे दाखल करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे प्रतिदाव्यातील अर्जदार यांचा अर्ज नामंजुर करणेत यावा.

४. प्रतिदाव्यातील अर्जदार तर्फे वकील यांनी असा युक्तिवाद केला की प्रतिदाव्यातील वादी क्र. ९ रघुनाथ शंकर पाटील हे दि. २९.९.२०२३ रोजी मयत झालेले आहेत. परंतु त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेकरीता १२ महिने ९ दिवस इतका विलंब झालेला आहे. मुळातच रघुनाथ पाटील व त्यांच्या पत्नी यशोदा रघुनाथ पाटील या देखील १०.०२.२०२३ रोजी मयत झालेल्या आहेत. मुळातच प्रस्तुत प्रतिदाव्यातील अर्जदार यांनी कोणताही जाणून बुजून विलंब केलेला नाही. तसेच वादी क्र. ९ यांचे कायदेशीर वारस यांचे विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द होणे गरजेचे आहे. तसेच प्रस्तुत वारस रेकॉर्डवर न आल्यास प्रतिदाव्यातील वादी यांच्या वारसांचे अपरिमीत नुकसान होणारे आहे. तसेच सदरचा अर्ज नामंजुर झाल्यास कायदेशीर गुंतागुत वाढणारी

आहे. अंतिमत अर्जदार तर्फे वकील यांनी वारसांनविरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द होउन वारस रेकॉर्डवर घेणेत यावेत अशी नम्र विनंती केली.

५. प्रस्तुत दोन्ही अर्ज, नि. १२६ वरील म्हणणे व इतर कागदपत्रांची छाननी केली असता हि गोष्ट दिसुन येते की प्रतिवादी याने प्रतिदावा हक्कज्ञापन व कायम मनाई करीता दाखल केलेला आहे. मुळातच प्रतिदाव्यातील वादी याने रघुनाथ शंकर पाटील यांच्या मृत्यु दाखल्याची सहीसुद प्रत व यशोदा रघुनाथ पाटील यांच्या मृत्यु दाखल्याची झेरॉक्स प्रत दाखल केलेली आहे. रघुनाथ शंकर पाटील हे दि. २९.०९.२०२३ रोजी मयत झाल्याचे दिसून येत आहे. तसेच यशोदा रघुनाथ पाटील या दि. १८.०२.२०२३ रोजी मयत झाल्याच्या दिसून येत आहेत. त्यामुळे एकंदरितच प्रतिदाव्यातील वादी यांना प्रस्तुत रघुनाथ व यशोदा यांचे वारस रेकॉर्डवर आणण्यास १२ महिन्याहुन जास्त कालावधी झाल्याचे दिसून येत आहे. परंतु दावा हा हक्कज्ञापन व कायम मनाई करीता असल्यामुळे प्रस्तुत वादी यांचे वारसांविरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द होउन प्रस्तुत वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे असे वाटते. त्यामुळे प्रस्तुत दोन्ही अर्ज मंजुर होणेस पात्र आहे असे वाटते. मात्र संपूर्ण दाव्यात व प्रतिदाव्यात झालेला विलंब हा देखील दुर्लक्ष करता येणार नाही. सबब मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. **प्रतिदाव्यातील वादी यांचा नि. १२५ व १२६ वरील अर्ज रक्कम रु. ५००/- मुळ दाव्यातील वादी यांना देण्याच्या अटीवर मंजुर करणेत येत आहे.**

२. **प्रतिदाव्यातील वादी यांनी वादी क्र. ९ चे वारस अभिलेखावर घेउन १४ दिवसात दुरुस्ती करावी व प्रतिदाव्याची दुरुस्ती प्रत तात्काळ दाखल करावी.**

**सही/-**
**के. दि. काकतकर**
सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
पन्हाळा

पन्हाळा
दि. १२.०६.२०२५